In Short

रिक्षा चालकाचा मृत्यू

। पुणे : भरधाव दुचाकी रिक्षावर आदळून झालेल्या अपघातात रिक्षाचालकाचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. २६) पहाटे कात्रज परिसरात घडली. अपघातात दुचाकीस्वार तसेच रिक्षातील सहप्रवासी उपचार घेत आहेत. आशिष तानाजी खरवले (३२, रा. वेढू, ता. भोर, जि. पुणे) असे मृत्युमुखी पडलेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे.

अल्पवयीनचे अपहरण

। नाशिक : चांदवड येथील लेंडी हट्टी येथील साडतीस घरातून राकेश प्रकाश वाघ या ११ वर्षीय मुलास बुधवारी (दि. २५) सायंकाळी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याप्रकरणी चांदवड पोलिसांत अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी मुलाची आजी सुमनबाई नोविंद माळी (६०, रा. लेंडीहट्टी, चांदवड) यांनी चांदवड पोलिसांत तक्रार दिली आहे.

राहुड घाटात अपघात

। नाशिक : चांदवड बाजूकडून मालेगाव बाजूकडे जाणाऱ्या मालट्रकने राहुड घाटातील म्हसोबा मंदिराच्या पुढे गतिरोधकाजवळ पिकअपला पाठीमागून जोरदार धडक दिली. मुंबई-आग्रा महामार्गावर राहुड घाटात झालेल्या या अपघातात पिकअपमधील दोन जण गंभीर जखमी झाले. सुनील अनिल बच्छाव (२६) व रोशन विलास शेकडे अशी त्यांची नावे असून जखमींना रुग्णवाहिकेतून मालेगाव येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

ट्रकखाली चिरडून तरुण ठार

। जालना : भरधाव ट्रकच्या टायरखाली सापडून तरुण जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना भोकरदन शहरातील पंचायत समिती कार्यालयासमोर शुक्रवारी बारा वाजेच्या सुमारास घडली. अनिल शिवाजी जाधव (२६) असे मृत तरुणाचे नाव आहे. अनिल शिवाजी जाधव हा पंचायत समिती कार्यालयाजवळील अमोल दौड यांच्या दुकानात मागील दोन वर्षांपासून पंक्चर काढण्याचे काम करायचा. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने दोघे भाऊ रोजंदारीवर काम करतात. अनिल जाधव हा टायर आणण्यासाठी नवीन भोकरदन परिसरात आला असता अपघात झाला.

गॅसच्या स्फोटात महिला ठार

। नाशिक : स्वयंपाक करत असताना अचानक गॅसचा स्फोट झाल्याची घटना सातपूर परिसरात घडली. या घटनेत महिला गंभीर भाजली होती. उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. मंगला संतोष डावरे असे गॅसच्या स्फोटात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. मंगला डावरे या गेल्या शनिवारी (दि. २१) आपल्या घरात स्वयंपाक करत असताना ही घटना घडली होती. अचानक गॅसचा स्फोट झाल्याने त्या गंभीर भाजल्या होत्या. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता, उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

चांद्यापासून बांद्यापर्यंत महाराष्ट्र अंधारात?

ग्रामपंचायतींच्या थकीत बिलापोटी 'कनेक्शन कट' करण्याची महावितरणची मोहीम

। अमित काळे / मुंबई : महावितरण कंपनीची बिले भरली नाहीत म्हणून आता कंपनीने राज्यातील ग्रामपंचायतींवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून थकीत असणारी ही बिले वसुलीसाठी महावितरणने आता अधिभार, व्याज काही टिकाणी चक्रवाढ व्याज आकारले असल्याने एकेका ग्रामपंचायतीची बिले काही लाखांमध्ये आहेत. ही बिले भरली नाहीत म्हणून कनेक्शन कट होत असल्याने चांद्यापासून बांद्यापर्यंतचा ग्रामीण महाराष्ट्र अंधारात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या बिलांबाबत शासनाचे धोरण ठोस नसल्याने गावपातळीवरील गावकारभारी संभ्रमात आहेत.

ग्रामपंचायतीच्या हद्दीत असणारे पथदिव्यांचे वीजबिल पूर्वी सरकारच भरत होते. २०१७-१८ पासून ही बिले सरकारने भरणे बंद केले. त्यानंतर ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून पैसे वळते करून शासनाने ही बिले भरून घेतली. त्यानंतर महावितरणकडून ग्रामपंचायतींना बिले मिळालीं नाहीत. ग्रामपंचायतींनीही निधीअभावी बिले भरली नाहीत. त्यामुळे ही थकबाकी वाढत गेली आहे. आता महावितरणकडून सर्व बिले व्याजासह आल्याने ग्रामपंचायतींच्या अडचणी वाढल्या आहेत. बिले भरली नाहीत तर कनेक्शन कट करण्याची कारवाई होत असल्याने गावांची वाटचाल काळोखाच्या दिशेने आहे.

मुळात घरपट्टी आणि पाणीपट्टी सोडले तर ग्रामपंचायतींचे उत्पन्नाचे मार्ग नाहीत. त्यात कोरोनामुळे स्थानिक पातळीवर वसुली नाही. अशा परिस्थितीत ग्रामपंचायती कोठून पैसे भरणार? असा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील २८ हजार ग्रामपंचायतींपैकी ७० टक्के ग्रामपंचायती छोट्या आणि अल्प उत्पन्न गटातील आहेत. त्यात ग्रामपंचायत ही सेवाभावी संस्था आहे. त्यामुळे ही बिले शासनानेच भरावीत, असा सूर आहे. गेल्या काही वर्षांपासून राज्यात हा प्रश्न न सुटणारा बनला आहे.

यावर मार्ग काढण्यासाठी जुलैमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ आणि ऊर्जामंत्री नितीन राऊत यांची बैठक पार पडली. यातून कसा मार्ग काढायचा, १४ व्या वित्त आयोगातून किती पैसे वजा केले, याबाबत जिल्हा परिषदांकडून माहिती मागवण्यात आली. कनेक्शन कापण्याची मोहीम थांबवून वापूर्ड बिलांबाबत काय निर्णय घ्यायचा, यासाठी पुनर्विचार समिती नेमण्यात आली. या बैठकीनंतर संबंधित प्रशासनाला काहीच लेखी आदेश देण्यात आलेले नाहीत. बिले कोणी भरायची? याबाबत कसलेच धोरण ठरवण्यात आलेले नाही. त्यामुळे गेल्या आठवडाभरापासून कनेक्शन कट करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. महावितरणच्या या कारवाईमुळे ग्रामीण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतलेल्या बैठकीनंतर ग्रामपंचायतींना दिलासा दिल्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले आणि दुसरीकडे आता कारवाईचा बडगा उगारला जात असल्याने संभ्रमाची स्थिती आहे. बैठकीत झालेल्या निर्णयाबद्दल संबंधित विभागांना लेखी स्वरूपात काहीच कळवले गेले नसल्याने हा गोंधळ निर्माण झाला आहे. समन्वयाचा आभाव यातून स्पष्ट होत आहे.

बिले शासनानेच भरावीत - पाटील

ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. कोरोनामुळे वसुली उणे आहे. अशात लाखोंची बिले ग्रामपंचायती कोठून भरणार? उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जी बैठक झाली, त्या बैठकीत काय ठरले, याबाबत कहीच लेखी स्वरूपात कळवण्यात आलेले नाही. त्यामुळे सोंधळ निर्माण झाला आहे. यावर तातडीने निर्णय घेऊन ग्रामपंचायतींना दिलासा द्यावा, अशी मागणी अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे.

ग्रामपंचायती सक्षम करा!

ग्रामपंचायतींना घरपट्टी, पाणीपट्टी इतकीच उत्पन्नाची साधने आहेत. यावर त्यांचे पगार आणि रोजचे खर्च चालत असतात. याशिवाय ग्रामपंचायतींना स्वतःचे असे कोणतेच उत्पन्न नाही. तेव्हा शासनस्तरावर ग्रामपंचायती सक्षम होण्यासाठी निर्णय होण्याची गरज आहे. मुद्रांक शुल्क, गौण खनिज याशिवाय अन्य विविध मार्गातून ग्रामपंचायतींचे उत्पन्न वाढू शकते. उत्पन्न वाढल्यानंतर पैसाच्याही प्रत्येकवेळी शासनाकडे मदत मागायची गरज ग्रामपंचायतींना भासणार नाही.

मध्य रेल्वेच्या कोकणात धावणार ६३ अतिरिक्त विशेष ट्रेन!

। मुंबई : गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी मध्य रेल्वेने अतिरिक्त ६३ स्पेशल ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यात एलटीटी ते रत्नागिरी, सावंतवाडी, दादर ते रत्नागिरी, मंगळूर या गाड्यांचा समावेश आहे. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गणेशोत्सवाला अवघे १० ते १२ दिवस राहिले आहेत. कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्यांची लगबग सुरु झाली आहे. गणेशोत्सवाकरिता वायूवीग मध्य रेल्वेने ११२ तर पश्चिम रेल्वेतर्फे ३८ स्पेशल ट्रेन चालविण्याची घोषणा केली आहे. या सर्व गणपती स्पेशल गाड्यांचे आरक्षण देखील फुल झाले असून प्रतीक्षा यादी ३५० च्या पुढे गेली आहे. त्यामुळे रेल्वेने जादा गाड्या सोडण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात होती. त्याची दखल घेत रेल्वेने अतिरिक्त ६३ स्पेशल ट्रेन चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या अतिरिक्त गाड्यांमुळे मध्य रेल्वेच्या गणपती स्पेशल गाड्यांची संख्या १७५ होणार आहे. या गाड्यांमुळे रेल्वेचे तिकिट न मिळाल्यास चाकरमान्यांना आरक्षित रेल्वे तिकिट मिळण्यास मदत होणार आहे.

असे आहे वेळापत्रक

०१२५३ एलटीटी ते रत्नागिरी ट्रेन १० सप्टेंबर रोजी पहाटे ५ वाजून ३३ मिनिटला सुटून दुपारी १२ वाजून ४५ मिनिटांनी रत्नागिरी ला पोचणार आहे. ०१२५७ एलटीटी ते सावंतवाडी ट्रेन ४ ते १४ सप्टेंबर दरम्यान शनिवार, मंगळवार आणि गुरुवारी रात्री ११ वाजून ३० मिनिटला निघणार आहे. ०१२५९ पनवेल ते सावंतवाडी ट्रेन रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवारी सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांनी निघून रात्री १० वाजून ३० मिनिटला पोहचणार आहे. ०१२६१ पनवेल ते चिपळूण ट्रेन ४ आणि १५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजून ५५ मिनिटला निघून दुपारी २ वाजून ३० मिनिटला पोहचणार आहे. तर ०१२६३ दादर ते रत्नागिरी ट्रेन ४,५,६ व ९ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजून १५ मिनिटला सुटून दुपारी ४ वाजून ५० मिनिटला पोहचेल. ०१२६७ दादर ते मंगळूरू ट्रेन १० सप्टेंबर रोजी वाशिबाय ०१२५५० नागपूर ते करमली ट्रेन चालविण्यात येणार आहे.

घसा ठीक झाल्यानंतर आवाज खणखणीत वाजवणार - नारायण राणे

। रत्नागिरी : सुशांतची केस संपली नाही आहे. दिशा सालियान प्रकरण अजूनही बाकी आहे. तुम्हाला जो कायदा तो आम्हालाही आहे. दादागिरी करू नका. तो तुमचा पिंड आहे. तुम्ही आम्हाला अनुभवलं आहे. आमच्या वाटेला जाऊ नका. आता पूर्वीसारखा दोन दिवसांत आवाज खणखणीत झाल्यानंतर समिती कायदेशर, असे म्हणत केंद्रीय मंत्री व भाजपा नेते नारायण राणे यांनी केंद्रीय मंत्रालाा अटक करून काय पराक्रम केला? असा सवाल उपस्थित केला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथे झालेल्या पोलिसांच्या कारवाईनंतर नारायण राणे यांची जनआशीर्वाद यात्रा शुक्रवारपासून पुन्हा रत्नागिरी शहरातून सुरू झाली. या वेळी बोलताना केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी शिवसेनेवर पुन्हा निशाणा साधला आहे. नारायण राणे म्हणाले की, माझाकडे पुष्कळ मसाला आहे. ३९ वर्षे सोबत होतो. शिवसेना औषधाला शोधून मिळू नये याची काळजी घ्या, असे राणे म्हणाले. वरुण सरदेसाई परत आल्यास परत जाणार नाही. आमच्या घरावर कुणी आल्यास आमची सोडणार नाही. विकायक विकासाचे काम आम्हाला करायची आहेत. आम्हाला घरात बसून कारभार नाही करायचा. धमक्या नारायण राणेना नका देऊ. माझाकडे पुष्कळ मसाला आहे. मी ३९ वर्षे होतो सोबत. जबळून सर्व माहिती आहे. त्यामुळे आमच्या वाटेला येऊ नये. कोकणच्या जेतकऱ्यांना माझ्या खात्याचा फायदा होईल, असा प्रयत्न करणार आहे. एका महिन्याच्या आत बैठक घेऊन प्रश्न तातडीने सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे, असे ते म्हणाले. त्यांनी म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभरात प्रतिष्ठा मिळवली आहे. अजून दोन दिवस दौरा आहे, आठवडा फिरून परत यसा असेल, त्यामुळे आता जास्त बोलत नाही, असे ते म्हणाले. संगमेश्वर येथे झालेल्या पोलिसांच्या कारवाईनंतर नारायण राणे यांची जनआशीर्वाद यात्रा शुक्रवारपासून पुन्हा रत्नागिरी शहरातून सुरू झाली.

राणेंच्या अटकेचे आदेश परब यांनी दिले

। पुणे : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना अटक करण्याचे आदेश शिवसेना नेते अनिल परब यांनी दिले होते, असा गौप्यस्फोट राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना केला. पुणे शहर आणि जिल्ह्यातील कोरोना स्थितीचा आढावा त्यांनी घेतला. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य राणे यांनी केले. या वक्तव्याचे पडसाद राज्यभर उमटत असताना संबंधित जिल्ह्यांचे पालकमंत्री म्हणून निर्णय घेणे आवश्यक होते. त्यानुसार पत्रकार परिषदेत संबंधित वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडून याबाबत परवानगी मागितली होती. त्यानुसार परब यांनी आदेश देऊन राणे यांना अटक करावी, असे पोलिसांना सांगितले. राणे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल गुन्हे दाखल करण्यात आले होते. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतल्यानंतर रात्री महाड पोलिसांनी अटक केली होती.

पुण्यातील आर्मी स्टेडियमला नीरज चोप्राचे नाव

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते उद्घाटन

। पुणे : टोकियो ऑलिम्पिकमध्ये भालाफेक प्रकारात सुवर्णपदक मिळवलेल्या सुभेदार नीरज चोप्राचे नाव पुण्यातील आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूच्या स्टेडियमला देण्यात आले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी यांचे उद्घाटन केले. यावेळी सैन्यदलातील ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

नीरज चोप्रा स्टेडिअम आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूच्या उद्घाटनप्रसंगी लष्करप्रमुख जनरल एम. एम. नरवणे, दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल जे. एस. नैन, आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूचे प्रमुख कर्नल राकेश यादव, नीरज चोप्रा आदींसह सैन्यदलातील ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेले २३ खेळाडू तसेच लष्करी अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी सैन्यातील खेळाडू दीपक पुनिया, प्रवीण जाधव आदींचा सन्मान करण्यात आला. यावेळी राजनाथ सिंह म्हणाले, पुण्यातील आर्मी स्टेडियमला नीरज चोप्राचे नाव देण्यात आले. ही सामान्य गोष्ट नसून हा देशवासीयांकडून करण्यात आलेला सन्मान आहे. त्या भूमीवर आपण एकत्र आलो आहोत, तिचा इतिहास पाहणे गरजेचे आहे. हा खेळच होता ज्याने शिवा नाचाच्या एका मुलाला छत्रपती शिवाजी महाराज बनवले. रामदास स्वामी, दादोजी कोंडदेव आणि जिजाऊ माँसाहेब यांनी लहानपणापासून त्यांना अशी शिकवण दिली होती. त्यातून ते एक राष्ट्रनायक बनले. भारतीय सेनाही त्या परंपरेला पुढे घेऊन जात आहे. भारतीय खेळाच्या इतिहासात मेजर ध्यानचंद, कॅप्टन मिल्खा सिंग, कर्नल राजवर्धनसिंह राठोड, कॅप्टन विजयकुमार शर्मा यांच्या परंपरेत आता सुभेदार नीरज चोप्रानेही आपले नाव सुवर्ण अक्षरांमध्ये जोडले आहे, अशा शब्दात राजनाथ सिंह यांनी नीरज चोप्राच्या कामगिरीचे कौतुक केले. हे फक्त खेळाडू नाहीत, ते सर्वांचे लीडर आहेत.

भारताला स्पोर्ट्स पॉवर बनवायचे ध्येय

आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट ही एक अद्वितीय आणि जागतिक सत्तावरील क्रीडा संस्था आहे. आतापर्यंत ३४ ऑलिम्पिक, २२ कॉमनवेल्थ गेम्समध्ये पदके जिंकली आहेत. तसेच, २१ एशियन गेम्स, ६ यूथ ऑलिम्पिक, १३ अर्जुन पुरस्कार विजेता दिले आहेत. सरकारकडून गेल्या काही वर्षात क्रीडा स्पर्धांमध्ये दर्जा वाढवण्याचे प्रयत्न होत आहेत. ही फक्त योजना नसून ही एक चळवळ आहे. ज्याला आपल्याला अजून पुढे घेऊन जायचे आहे. आपल्याला या प्रयातानुन वश आणि नवे आयाम यातून भारताला जगातील स्पोर्ट्स पॉवर बनवण्याचे ध्येय आहे, असेही राजनाथ सिंह यांनी सांगितले.

आ. दिलीप लांडे यांच्या निवडीला आव्हान

नसीम खान यांची याचिका

। मुंबई : शिवसेना आमदार दिलीप लांडे यांच्या निवडीला आव्हान देणारी निवडणूक याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. काँग्रेसचे नेते नसीम खान यांनी दाखल केलेल्या याचिकेची दखल घेत न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी दिलीप लांडे यांना भूमिका मांडण्यासाठी तीन आठवड्यांचा वेळ देत याचिकेची सुनावणी चार आठवडे तहकूब ठेवली.

चांदिवली विधानसभा २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवार नसीम खान यांचा ४०९ मतांनी शिवसेना उमेदवार दिलीप लांडे यांनी पराभव करून विजय मिळवला होता. लांडे यांच्या या निवडीलाच खान यांनी आक्षेप घेतला. २० ऑक्टोबर २०१९ रोजी म्हणजेच मतदानाच्या आदल्या दिवशी शिवसेना कार्याध्यक्ष आणि विद्यमान मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी परिवहन मंत्री अनिल परब यांच्यासोबत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कालावधीपेक्षा जास्तकाळ प्रचार केला. त्याविरोधात उमेदवार लांडे यांच्याविरोधात निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रारही दाखल केली. मात्र निवडणूक आयोगाने तक्रारीची दखल घेतली नाही. लांडे यांच्या प्रचारात आचारसंहितेचा भंग झाल्याचा आरोप करत नसीम खान यांनी निवडणूक याचिका दाखल केली. या याचिकेवर न्या. संदीप शिंदे यांच्यासमोर शुक्रवारी सुनावणी झाली.

जाहीर सूचना प्रसिद्धी

मुख्याधिकारी नगर परिषद, उस्मानाबाद दि. उस्मानाबाद हे उस्मानाबाद शहरातील एकूण (५) कत्तलखाही सर्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या कागदिक नोंदणीकृत तेकेदाराकडून ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागविले आहेत.

निविदाबाबत सर्व तपशील, अटी, शर्ती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २७-०८-२०२१ रोजी उपलब्ध उपलब्ध आहे.

टीप : १) निविदा सुचनांमध्ये काही बदल झाल्यास वरील संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

२) कोनतेही एका किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

स्वाक्षरीत :-
(हर्षकल्याण येलगुंडे)
मुख्याधिकारी
नगर परिषद उस्मानाबाद

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra
मुख्य कार्यालय: निगमित सेवा विभाग
'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे 411 005
फोन : 020-25537239/240

प्रस्तावासाठी विनंती (आरएफपी)

बँक ऑफ महाराष्ट्र "आपल्या शाखा / कार्यालयांसाठी (पॅन इंडिया) फिजिकल सुरक्षा उपकरणांचा पुरवठा करणे, तसेच ती बसवून देणे यासाठी दर करार यांची सूची (एम्पॅनेलमेंट) तयार करण्यासाठी" मोहोरबंद निविदा आमंत्रित करीत आहे. संपाच्य प्रस्तावक आरएफपीची निविदा प्रपत्र बँकेची वेबसाईट www.bankofmaharashtra.in वरून डाऊनलोड करून घेऊ शकतात.

प्रस्तावपूर्व बैठक दि. 04/09/2021 रोजी आयोजित करण्यात आली आहे. आरएफपी सादर करण्याची अंतिम तारीख दि. 14/09/2021, दु. 12.00 पर्यंत आहे. तांत्रिक निविदा दि. 14/09/2021 दु. 3.00 वा. उघडण्यात येतील आणि प्रस्तावकांना त्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

वरील निविदेसंदर्भातील इतर परिशिष्ट / शुद्धीपत्रक / विस्तृतीत तारखा / स्पष्टीकरण/ प्रस्तावकांच्या शंकांसंदर्भातील निरसन, हे सर्व फक्त बँकेची वेबसाईट www.bankofmaharashtra.in वर पोस्ट करण्यात येईल आणि वासंदर्भात वोणतीही स्वतंत्र अधिसूचना वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही.

उप महाव्यवस्थापक, निगमित सेवा विभाग

SBI
भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

सूचना

भारतीयस्टेटबँकेच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बीकेएचे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून लागू झाली आहे. सदरिबाबतची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०९.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने वर्ग इक्विटीला, दर लाभांश दिले नसेले भाग वगळता ही रु. १ दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथावधीच पूर्वी झालेल्या हस्तांतरण मिलेखा (मिलेखां) सह / विना, उक्त भाग/ बॉण्डचे यथावधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हस्तगती/ गहाण झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिभूती भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डांचधी खोलाच्ही यादीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्सफर एजंट मेसर्स अलॉटमेंट असोसीएशन लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालान एक्सटेंशन, नवी दिल्ली - ११००५५ (ईमेल आयडी: sbi.igr@alankit.com) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिभूती भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

अनु. क्रमांक	भाग/बॉण्ड नाव	समभाग संख्या	प्रमाणपत्र क्रमांक पासून	पर्यंत	विशिष्ट क्रमांक पासून	पर्यंत
१	०७०००३२१	रामेश्वर शर्मा	३१२	६३००००	६३००००	८०५८११६०३	८०५८११६११४
२	००७२०५४४	पाटील वैजयंती विजय पाटील विजय नामदेव पाटील आदिश्री विजय	१३०	३३४१९	३३०००	७३८१९६१२६१	७३८१९६१४१०
३	००४१४८१९	सीएट सिंह सौदान अनिता सौदान	३०	४६३००	४६३००	७३८४४१९४१	७३८४४१९७००
४	००१११४८५	रवि वी के	८००	२३९१२६	२३९१२६	७४६१६३३०१	७४६१६३३८००
५	००४२१४४१	विजय कुमार आडवाल	१४०	६३२१४५	६३२१४५	८०८२४४४००	८०८२४४४५४४
६	००४०१५३४	किन लाल केशियान	१४०	६३०१३८	६३०१३८	८०४१२३०८९	८०४१२३०९२०
७	०१४२१५७४	सौम्य प्रीतम पौनपाल स्वाती श्री पौनपाल स्वाती स्वाती	१००	१४८०१	१४८०१	७४१७७५१३१	७४१७७५१३४
८	०७४०४७०१	सेना कुट्टी कॉलेज सुकुमार जेना बॉसेस जैनीश जेना बॉसेस	४४०	६२०५०३	६२०५०३	८०१०८८४१७७	८०१०८८४१८५
९	०२१६३३४३	एस पुरुषोत्तमी	१००	१४६१२०	१४६१२०	७४३४४४४४१	७४३४४४४४०
१०	००४१२०१२	चंद्रभान शर्मा अनिता शर्मा	३०	४४४१५	४४४१५	७३८४४२१२१	७३८४४२१८०
११	०६०१४०३३	समाज ओबेरॉय	१३०	२२५१४६	२२५१४०	७४१४१४३२१	७४१४१४८१००

वसीत आकारे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अधिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवितात.

स्थळ: मुंबई
दिनांक: २८.०८.२०२१

समभागांची संख्या: ४०३२
स.प्रमाणपत्रांची संख्या: १३

महाव्यवस्थापक
(सेअर्स व बॉण्ड्स)

मानीव अभिहस्तांतरण संबंधी जाहीर नोटीस
ओमकार पॅराडाईज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

पत्ता : गोपीनाथ चौक, महाराष्ट्र नगर, एम.पी. रोड, डोंबिवली (प.), ता. कल्याण, जि. ठाणे

यांनी खालील मिळकतीचे एकत्रची मानीव अभिहस्तांतरण करन मिळणेबाबत या कार्यालयाकडे महाराष्ट्र मालकी-हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्याच प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ अन्वये अर्ज केलेला आहे. सदर अर्जाची पुढील सुनावणी दि. ०९/०९/२०२१ रोजी दु. ३.०० या. खालील नमूद कार्यालयीन पत्त्याचा निश्चित करण्यात आलेली आहे.

प्रतिवादी - मेसर्स अंबेकरा एंटरप्राइजेसचा कर्ता भागीदार श्री. अनिल भोईर, श्री. विलराम मराठे, श्री. बाबू विलराम मराठे, श्री. भागीराथी भोईर, श्री. पांडुरंग भोईर, श्री. होरा भोईर, श्री. गंगाराम भोईर, श्रीम. पार्वतीबाई पाटील, श्रीम. जुईबाई पाटील, श्री. डामेरान बाबू मराठे, श्री. सुनील मराठे, श्री. राजेश मराठे, श्रीम. रघुबाई मराठे, श्रीम. सुनिता मराठे, श्रीम. ललिता मराठे, श्री. विक्रम मराठे, श्रीम. सपना मराठे, श्री. प्रदीप मराठे, श्री. रामदास मराठे, श्रीम. प्रभावती मराठे, श्री. हेमंत मराठे, श्री. अतिश मराठे, श्रीम. सुप्रिया मेहता, श्रीम. संगिता मराठे, श्री. संतोष भोईर, श्री. किरण भोईर, श्री. निलेश भोईर, श्रीम. विद्या पाटील आणि या मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे वरील सुनावणीचे दिवशी व वेळी हजर राहून सादर करावे.

कोविड-१९ या जागतिक महामारीच्या प्रादुर्भावामुळे आपण आपले लेखी म्हणणे सद्यस्थितीत खालील नमूद ईमेल वर पाठवू शकतात.

Email Id - ddr.tna@gmail.com, ddr.tna20@gmail.com

मालमत्ता वर्णन : गोंडे - डोंबळी, ता. जि. ठाणे

जुना सर्व्हे नं.	नविन सर्व्हे नं.	हिस्सा नं.	प्लॉट नं.	क्षेत्रफळ
१३६ (पार्ट)	४/२१३	-	-	३४८३.०० चौ.मी.
१३७	४/१३४			

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, पहिला मजला, गावदेवी मंडई, ठाणे (प.), जि. ठाणे. पिन कोड - ४०० ६०२. दूरध्वनी-०२२ २५३३१४८९,
दिनांक : २७/०८/२०२१

शिक्का

सही/-
सहाय्य प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे

मानीव अभिहस्तांतरण संबंधी जाहीर नोटीस
कॉसमॉस नेस्ट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

पत्ता : ढोकाळी नाका, कोलशेत रोड, ठाणे (प.), जि. ठाणे-४०० ६०७

यांनी खालील मिळकतीचे एकत्रची मानीव अभिहस्तांतरण करन मिळणेबाबत या कार्यालयाकडे महाराष्ट्र मालकी-हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्याच प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ अन्वये अर्ज केलेला आहे. सदर अर्जाची पुढील सुनावणी दि. १६/०९/२०२१ रोजी दु. १२.३० या. खालील नमूद कार्यालयीन पत्त्याचा निश्चित करण्यात आलेली आहे.

प्रतिवादी - श्री. सुनिल सत्पाल गुप्ता, श्री. अपिर्ष सत्पाल गुप्ता, मेसर्स माणदेव कन्स्ट्रक्शन भागीदार. श्री. सुरज आर. परवार, श्री. बनिता डी. सांडेलकार, मेसर्स हर्ष इंटरप्रायजेस भागीदार श्रीम. उषा जगदिश जैन, श्री. बाबुलाल वि. जैन, श्री. जगदिश के. सोलंकारी, श्रीम. चिमीला के. सोलंकारी, श्री. नरेंद्र एस. सोलंकारी, श्री. गुंजन एस. सोलंकारी, श्री. उत्तमराज एस. जैन, श्री. श्रीकांत एस. जैन, श्री. संतोष एस. जैन, श्रीम. रेखा पी. जैन, श्री. राम वि. सुराणाएणी, श्री. राजकुमार एस. गिद्री आणि या मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे वरील सुनावणीचे दिवशी व वेळी हजर राहून सादर करावे.

कोविड-१९ या जागतिक महामारीच्या प्रादुर्भावामुळे आपण आपले लेखी म्हणणे सद्यस्थितीत खालील नमूद ईमेल वर पाठवू शकतात.

Email Id - ddr.tna@gmail.com, ddr.tna20@gmail.com

मालमत्ता वर्णन : गोंडे - डोंबळी, ता. जि. ठाणे

| जुना सर्व्हे नं. | नविन सर्व्हे नं. | हिस्सा नं. | प्लॉट नं. | क